# छावडी तालुका साक्री  येथे कापूस पिक कार्यशाळा संपन्न

विशेष कापूस प्रकल्प अंतर्गत मौजे छावडी तालुका साक्री  येथे दिनांक ०५/१२/२०२४ रोजी एकदिवसीय कापूस पिकाच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी विज्ञान केंद्र, धुळे येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. दिनेश नांद्रे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून हितेंद्र सोनवणे, प्रकल्प संचालक आत्मा, धुळे, श्री. लोटन मासुळे सरपंच छावडी व श्री. निलेश पवार, लुपिन फाउंडेशन, धुळे उपस्थित होते. सदर कापूस पिक कार्यशाळेत मार्गदर्शक म्हणून श्री. जगदीश काथेपुरी, शास्त्रज्ञ कृषी विद्या विभाग कृषी विज्ञान केंद्र, धुळे डॉ. पंकज पाटील शास्त्रज्ञ पिक संरक्षण विभाग डॉ.आतिश पाटील शास्त्रज्ञ मृदा विभाग कृषी विज्ञान केंद्र, धुळे उपस्थित होते.

डॉ. दिनेश नांद्रे यांनी अध्यक्ष स्थानावरून बोलताना शेतकरी बांधवांनी श्री. दादा लाड तंत्रज्ञानाचा अवलंब करावा व या विशेष कापूस प्रकल्पामध्ये जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवून कापूस पिकाचे अधिकाधिक उत्पादन घ्यावे असे आवाहन केले.

श्री. जगदीश काथेपुरी यांनी मार्गदर्शन करताना कापूस पिकाची लागवड तीन बाय एक फूट अंतरावर करावी, ४५ दिवसांच्या आत गळफांदी काढावी, गळफांदी व फळफांदी यातील फरक तसेच कापूस कमरे एवढा झाल्यावर किंवा ८५ ते ९० दिवसांनी कापूस पिकाचा मुख्य शेंडा खुडावा असे सांगून श्री. दादा लाड तंत्रज्ञानावर सखोल मार्गदर्शन केले.

डॉ.पंकज पाटील यांनी ड्रोन द्वारे फवारणी व ड्रोन याविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले व डॉ. आतिश पाटील यांनी जमिनीचे आरोग्य व त्याची देखभाल याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री जीवन दगडू राणे, श्री रमेश शिंदे यांनी परिश्रम घेतले.




श्री. जगदीश काथेपुरी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना



उपस्थित शेतकरी वर्ग